सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८.

# मुंबई न्यायविषयक कामकाज (प्रतिवृत्तांचे नियमन करणे) अधिनियम, १९५५

(दिनांक ३१ डिसेंबर १९८७ पर्यंत सुधारित)

*Bombay Act No. XVIII of 1955*

# THE BOMBAY JUDICIAL PROCEEDINGS (REGULATION OF REPORTS) ACT, 1955

(*As modified up to the 31st December, 1987*)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[किंमत : रुपये २-०० ]

# मुंबई न्यायविषयक कामकाज (प्रतिवृत्तांचे नियमन करणे) अधिनियम, १९५५

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. . .. .. ..
२. व्याख्या .. .. .. .. ..
३. न्यायसंबंधी कामकाजांच्या प्रतिवृत्तांच्या प्रकाशनावर निर्बंध ..
४. शिक्षा .. .. .. .. ..
५. अपराधांची न्यायचौकशी करण्याचा क्षेत्राधिकार ..
६. आगाऊ मंजुरी .. .. .. .. ..
७. दंड प्रक्रिया संहिता याच्या ९९-अ, या कलमाअन्वये वृत्तपत्रे वगैरे जप्त करणे व अभिग्रहण करणे.
८. इतर विधीचा अंमल. . .. .. .. ..

अनुसूची.

# [सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८][१]

[मुंबई न्यायविषयक कामकाज (प्रतिवृत्तांचे नियमन करणे) अधिनियम, १९५५]

[६ मे, १९५५]

## न्यायसंबंधी कामकाजाच्या प्रतिवृत्तांच्या प्रकाशनाचे नियमन करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** अश्लील किंवा असभ्य मजकूर किंवा जो मजकूर प्रसिध्द करणे सार्वजनिक हिताचे होणार नाही तो मजकूर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने न्यायासंबंधी कामकाजाच्या प्रतिवृत्तांच्या प्रकाशनाचे नियमन करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

**१.** (१) या अधिनियमास मुंबई न्यायसंबंधी कामकाज (प्रतिवृत्तांचे नियमन करणे) अधिनियम, १९५५ असे म्हणावे. लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो, संबंध मुंबई राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमील त्या दिनांकास अंमलात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे भाग पडत नसेल तर,–

(अ) "पुस्तक" या संज्ञेत, स्वतंत्रपणे छापलेला किंवा शिळाछापावर काढलेला किंवा अन्य यांत्रिक साधनांनी तयार केलेला कोणत्याही भाषेतील प्रत्येक ग्रंथ, ग्रंथाचा भाग किंवा विभाग, पुस्तिका आणि पत्रक, आणि प्रत्येक स्वरलिपी पत्रिका, नकाशा, किंवा आराखडा, यांचा समावेश होतो ; व्याख्या.

(ब) "दस्तऐवज" या संज्ञेत, कोणतेही रंगीत चित्र, चित्रकलाकृती किंवा छायाचित्र किंवा अन्य दृष्टिगोचर-प्रतिकृती यांचा समावेश होतो ;

(क) "न्यायसंबंधी कामकाज" या संज्ञेत, कामकाजाच्या क्रमात वैधरीत्या शपथेवर साक्षी पुरावा घेण्यात येतो किंवा घेण्याचा अधिकार आहे अशा कोणत्याही कामकाजाचा समावेश होतो ;

(ड) "विवाहविषयक बाब" या संज्ञेचा अर्थ, विवाहाचे विच्छेदन किंवा विवाह रद्द ठरविण्यासंबंधीचे, किंवा न्यायिक वियोजनासंबंधीचे किंवा वैवाहिक हक्क परत मिळविण्यासंबंधीचे कोणतेही कामकाज, असा आहे ;

(इ) "वृत्तपत्र" या संज्ञेचा अर्थ, सार्वजनिक वृत्त किंवा सार्वजनिक वृत्तावरील अभिप्राय ज्यात असतो असे कोणतेही वृत्तपत्र, असा आहे ;

**३.** कोणत्याही व्यक्तीने,–

(क) न्यायसंबंधी कामकाजाच्या सबंधांत, सार्वजनिक नितिमत्तेस अपाय करण्याचा हेतू असलेला कोणताही असभ्य किंवा अश्लील मजकूर किंवा कोणताही असभ्य किंवा अश्लील तपशील, मग तो वैद्यकविषयक असो किंवा शस्त्रविद्याविषयक असो किंवा इंद्रियविज्ञानविषयक असो ; न्यायसंबंधी कामकाजांच्या प्रतिवृत्तांच्या प्रकाशनावर निर्बंध.

(ख) कोणत्याही विवाहविषयक बाबीच्या संबंधात, किंवा भारतीय दंड संहिता याच्या कलम ४९७ अन्वयेच्या अपराधांच्या संबंधातील कोणत्याही न्यायसंबधी कामकाजाच्या बाबतीत पुढील गोष्टीखेरीज अन्य कोणताही तपशील :– १८६० चा ४५.

(१) पक्षकारांची नावे ; आणि

(२) न्यायालयाचा आदेश ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९५५, भाग-पाच, पृष्ठ-३ पहा.

(ग) भारतीय दंड संहिता याची कलमे ३५४, ३६६, ३६६-अ, ३६६-ब, ३७६, ३७७ किंवा ४९८, या अन्वयेच्या अपराधाच्या संबंधातील कोणत्याही न्यायसंबंधी कामकाजाच्या बाबतीत पुढील गोष्टींखेरीज अन्य कोणताही तपशील :—

(१) आरोपित व्यक्तीचे नाव, व्यवसाय व पत्ता; आणि

(२) ज्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतींत अपराध घडला असेल त्या व्यक्तीचे नाव,गाव उघड न करता किंवा ज्यामुळे त्या व्यक्तीचे नाव-गाव कळून येईल असा कोणताही तपशील न देता,

न्यायालयाचा आदेश ;

छापता किंवा प्रसिध्द करता किंवा छापविता किंवा प्रसिध्द करता येणार नाही :

परंतु, या कलमातील कोणताही मजकूर कोणत्याही न्यायसंबंधी कामकाजाच्या बाबतीत उपयोग करावयाची कोणतीही कैफियत, साक्षी पुराव्याची नक्कल किंवा अन्य दस्तऐवज छापण्यास किंवा कामकाजाशी संबंध असलेल्या व्यक्तींना ते कळविण्यास किंवा न्यायालयाच्या निदेशास अनुसरून कोणतीही नोटीस किंवा प्रतिवृत्त छापण्यास किंवा प्रसिध्द करण्यास किंवा स्वतंत्र ग्रंथाच्या स्वरूपात किंवा विधि प्रतिवृत्तांच्या कोणत्याही ख-याखु-या मालिकेच्या भागांत किंवा विधि किंवा वैद्यकीय व्यवसायातील व्यक्तीमध्ये प्रस्तृत करण्याचा खराखुरा हेतू असलेल्या तांत्रिक स्वरूपाच्या कोणत्याही प्रकाशनात कोणताही मजकूर छापण्यास किंवा प्रसिध्द करण्यास लागू असणार नाही.

शिक्षा.

**४.** जो कोणी, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, दोषी ठरविण्यात आल्यानंतर, सहा महिने असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा किंवा एक हजार रुपये असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील ; आणि ज्या संबंधात अपराध घडला असेल ते कोणतेही वृत्तपत्र, पुस्तक किंवा दस्तऐवज हेही (त्याच्या सर्व प्रती धरून) सरकारजमा होण्यास पात्र असतील.

अपराधांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता.

**५.** प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा पहिल्या वर्गाचा न्यायाधीश यांच्या न्यायालयांपेक्षा कोणत्याही कनिष्ठ न्यायालयाला या अधिनियमाअन्वये कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता येणार नाही.

आगाऊ मंजुरी.

**६.** कोणत्याही न्यायालयाने, राज्य शासनाची पूर्व मंजूरी असेल ते खेरीजकरून, अपराधाची न्यायचौकशी करता कामा नये.

दंड प्रक्रिया संहिता याच्या ९९-अ या कलमाअन्वये वृत्तपत्रे वगैरे जप्त करणे व अभिग्रहण करणे.

१८९८ चा ५.

**७.** दंड प्रक्रिया संहिता, १८९८* याचे कलम ९९-अ उपबंध ह्या अधिनियमास जोडलेला अनुसूचीत निर्दिष्ट केल्याप्रमाणे याअन्वये सुधारण्यांत आले आहेत आणि कलम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असेले तरी, सुधारल्याप्रमाणेच्या उक्त कलमाची तरतूद या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणताही मजकूर ज्यात असल्याचे राज्य शासनाचे मत असेल ते कोणतेही वृत्तपत्र, पुस्तक किंवा दस्तऐवज यास लागू असतील.

इतर विधिचा अंमल.

**८.** यात काहीही अंतर्भूत असले तरी, ह्या अधिनियमाअन्वये अपराध ठरत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तींवर इतर कोणत्याही विधि अन्वये खटला भरला जाण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.

## अनुसूची

(कलम ७ पहा)

दंड प्रक्रिया संहिता, १८९८ याचे कलम ९९-अ यात, "असे राज्य शासनास वाटत असेल" या शब्दांच्या नंतर, " कोणत्याही न्यायसंबंधी कामकाजाच्या बाबतीत, सार्वजनिक नितिमत्तेस अपाय पोहोचविण्याचा हेतू असलेला कोणताही असभ्य किंवा अश्लील मजकूर किंवा कोणताही असभ्य किंवा अश्लील तपशील मग तो वैद्यकविषयक असो किंवा शस्त्रविद्याविषयक असो किंवा इंद्रियविज्ञानविषयक असो, असे किंवा " हे शब्द दाखल करावे.

*आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.